Estd 1962

Naac 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दि.२४/९/२०२२

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल २०२२ उन्हाळी सत्राच्या एकुण **७४७** अभ्यासक्रमाच्या परीक्षापैकी विद्यापीठस्तरावरील **५६१** परीक्षा एम.सी.क्यू.ऑफलाईन पध्दतीने नुकत्याच पार पडल्या.

आज दि.२४ सप्टेंबर २०२२ M.Sc.(Maths) Sem – 1 & 2, M.A. (Marathi) Sem – 1 & 2 अशा **04** परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले असून आजपर्यंत एकुण **516** परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत.

उपरोक्त ७४७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा हया ओएमआर उत्तरपत्रिकांचा वापर करुन झालेल्या असून हया ओएमआर शिटवर विद्यार्थ्यांनी त्यांचा पीआरएन नंबर (PRN No.), बैठक क्रमांक (Seat No.), विषय सांकेतांक (Subject Code) इ. माहिती चुकीची लिहिल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये अनुपस्थित (Ab) असे नमूद होवून निकाल घोषित झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांचे निकाल सुधारित करण्यासाठी आवश्यक उपरोक्त नमूद केलेली माहिती संकलित करण्यात येत असून त्यासाठी सर्व अधिविभाग, संलग्नित महाविद्यालये यांनी खाली नमूद केलेल्या लिंकवर परीक्षा ॲप्रुव्ह करणेसाठी दिलेल्या लॉगिन आयडी पासवर्डचा वापर करुन माहिती सादर करावी. तसेच ही सर्व माहिती आपल्या अधिविभागातील/महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून माहिती लवकरात लवकर सादर करण्यात यावी असे आवाहन मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

**Link – http://studentapps.unishivaji.ac.in/exam report**

तसेच शैक्षणिक वर्ष २०२२—२३ या वर्षासाठी एम.फिल./पीएच.डी. साठीची प्रवेश परीक्षेचे आयोजन दि.२२ ते २४ सप्टेंबर २०२२ या कालावधीत श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर, श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली व यशवंतराव चव्हाण इस्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा या तीन परीक्षा केंद्रावर करण्यात आले होते. आज दि.२४ सप्टेंबर २०२२ रोजी एकुण ४८८८ विद्यार्थ्यांपैकी ३४७० इतक्या विद्यार्थ्यांनी एम.फिल./पीएच.डी. साठीची प्रवेश परीक्षा दिली. आज Political Sc., Electronics Engineering, Geography, Mass Communication/ Journalism, Statistics, Psychology, Social Work, Electronics & Telecommunication Engineering, History, Mathematics, Sociology, Electrical Engineering, Education, Computer Sc., Textile Engineering Urdu या विषयाच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.